फोन नं.०२२ ६९१६२३००
romumbai@dtemaharashtra.gov.in
www.jdteromumbai.org.in

महाराष्ट्र शासन

# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन परिसर
४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.

क्र. २/विकामुं/तंशि/आस्था-२/नियुक्ती-आदेश/२०२५/२०६१ दिनांक : 14 AUG 2025

**नियुक्ती आदेश-**

**विषय : महाराष्ट्र लोकसेवा आयोग पुरस्कृत उमेदवारांची ग्रामिण संवर्गातुन गट-क संवर्गातील "लिपिक-टंकलेखक" या पदावर नियुक्ती देणेबाबत.**

संदर्भ :- १. उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांचे पत्र क्र.संकीर्ण-२०२२/(प्र.क्र.१५९/२२)/तांशि-१, दि.३१/०७/२०२५

२. तंत्रशिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.डीटीईएम/४६/२०२५-डेस्क १२, दि.०१/०८/२०२५

उच्च व तंत्रशिक्षण विभाग व तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे संदर्भीय पत्रान्वये दिलेल्या निर्देशानुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शिफारस केलेल्या **गट-क संवर्गातील "लिपिक-टंकलेखक"** या पदावर नियुक्तीसाठी पात्र ठरलेल्या खालील उमेदवारांना सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई यांचे अधिनस्त असलेल्या शासकीय संस्थेमध्ये **ग्रामिण संवर्गात** त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या संस्थेत तात्पुरत्या स्वरुपात खालील अटी व शर्तीच्या अधीन राहुन नियुक्ती देण्यांत येत आहे.

| अ.क्र. | लोकसेवा आयोगाच्या यादीनुसार प्राधान्यक्रम | उमेदवाराचे नाव व पत्ता | उमेदवाराचा मुळ प्रवर्ग | म.लो.से. आयोगाने शिफारस केलेला नियुक्तीचा प्रवर्ग | नियुक्तीच्या आस्थापनेचे नाव व पत्ता |
|---|---|---|---|---|---|
| १. | १. | श्री. राहुल बाबासाहेब किर्तने मु. किर्तनवाडी, पो. खरवंडी कासार, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर- ४१४११३ | भ.ज. (ड) | भ.ज. (ड) (सर्वसाधारण | शासकीय तंत्रनिकेतन, पेण रामवाडी शिवाजी नगर, पेण जि. रायगड- ४०२१०७ |
| २. | २. | श्री. अमोल जगन्नाथ बरबडे, को. ऑपरेटीव बँक जवळ, मु.पो. बिबी, ता. लोणार, जि. बुलढाणा- ४४३ २०२ | इतर मागास प्रवर्ग | इतर मागास प्रवर्ग (सर्वसाधारण) | लोकनेते शामराव पेजे, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, रत्नागिरी थिबा पॅलेस रोड, रत्नागिरी -४१५६१२ |
| ३. | ५. | श्रीम. शिल्पा शिवाजी पाटील मु. पो.कोनवडे, ता. भुदरगड, जि.कोल्हापुर- ४१६२०६ | आर्थिक दुर्बल घटक | आर्थिक दुर्बल घटक (महिला) | शासकीय तंत्रनिकेतन, मालवण, पो.कुंभारमाठ, ता. मालवण, जि. सिंधुदुर्ग- ४१६६०६ |

| अ.क्र. | लोकसेवा आयोगाच्या यादीनुसार प्राधान्यक्रम | उमेदवाराचे नाव व पत्ता | उमेदवाराचा मुळ प्रवर्ग | म.लो.से. आयोगाने शिफारस केलेला नियुक्तीचा प्रवर्ग | नियुक्तीच्या आस्थापनेचे नाव व पत्ता |
|---|---|---|---|---|---|
| ४. | ६. | श्री. प्रविण शांताराम शिरसाट मु. कुपटा पो. कान्हेरी (ग), ता. बाळापुर, जि. अकोला- ४४४३०२ | अनुसूचित जाती | अनुसूचित जाती (सर्वसाधारण) | शासकीय तंत्रनिकेतन, रत्नागिरी, थिबा पॅलेस रोड, रत्नागिरी -४१५६१२ |
| ५. | ७. | श्री. सौरभ ज्ञानदेव भापकर, मु. साठेफाटा, पो. गोखळी ता.फलटण, जि.सातारा- ४१५ ५२३ | आर्थिक दुर्बल घटक | आर्थिक दुर्बल घटक (दिव्यांग) | शासकीय तंत्रनिकेतन, पेण रामवाडी शिवाजी नगर, पेण जि. रायगड- ४०२१०७ |
| ६. | ८. | श्रीम. कामिनी अनंतराम दमाहे मु. भडंगा, पो. मुंडीपार ता.गोरेगांव जि. गोंदीया- ४४१ ८०१ | इतर मागास प्रवर्ग | इतर मागास प्रवर्ग (महिला) | लोकनेते शामराव पेजे, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, रत्नागिरी थिबा पॅलेस रोड, रत्नागिरी -४१५६१२ |
| ७. | ११. | श्री. भगवंत काशिराम पारेकर मु. पो. येडधरी, ता. जाट, जि.सांगली- ४१६ ४०४ | भ.ज. (क) | अराखीव (माजी सैनिक) | लोकनेते शामराव पेजे, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, रत्नागिरी थिबा पॅलेस रोड, रत्नागिरी -४१५६१२ |

सदर उमेदवारांची सेवाजेष्ठता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे शिफारसक्रम व उमेदवारांचे प्राप्त गुणानुक्रमानुसार आदेशाच्या दिनांकापासून ३० दिवसाच्या आत संबंधीत उमेदवार नियुक्तीच्या पदावर रुजू होण्यावर अथवा मुदतवाढीवर अवलंबून असेल.

**अटी व शर्ती:-**

१) शासन अधिसुचना, वित्त विभाग क्र.वेपुर-२०१९/प्र.क्र.१/सेवा९, दि.३०/०१/२०१९ मध्ये नमूद असलेल्या वेतन संरचनेतील सातव्या वेतन आयोगानुसार पे मॅट्रीक्स **मधील स्तर-६ (१९९००-६३२००)** या सुधारीत वेतन श्रेणीत मूळ वेतन अधिक शासनाने वेळोवेळी मंजूर केल्याप्रमाणे महागाई भत्ता व इतर भत्ते नियमाप्रमाणे अनुज्ञेय राहतील.

२) सदर सेवा ही शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या नियम व अटीवर असेल.

३) उमेदवारांची नियुक्ती तात्पुरत्या स्वरुपात असून, सेवेत रुजू झाल्यानंतर पोलिस खात्याकडून **त्यांची चारित्र्य आणि पुर्वचारित्र्य यांची पडताळणी** केल्यावर कोणताही प्रतिकुल अहवाल प्राप्त न झाल्यास पुढे चालू ठेवण्यांत येतील. प्रतिकुल अहवाल प्राप्त झाल्यास त्यांची **"लिपिक-टंकलेखक"** या पदावरील सेवा कोणतीही पूर्वसूचना न देता तात्काळ समाप्त करण्यांत येतील.

४) संस्था प्रमुखांनी सदर उमेदवाराचे विहित केलेल्या शासकीय रुग्णालयातील अधिकाऱ्याचे **"शारिरीक स्वास्थ्य प्रमाणपत्र"** दोन महिन्यांच्या आत सादर करावे लागेल. वैद्यकिय प्रमाणपत्रान्वये सदर पदाकरीता अपात्र ठरल्यास त्यांची सेवा समाप्त करण्यांत येईल.

५) उमेदवारांची नियुक्ती झाल्यानंतर बढती/बदली इत्यादीबाबतची कार्यवाही प्रचलीत शासकीय नियम व त्यामध्ये वेळोवेळी केल्या जाणाऱ्या सुधारणा यानुसार केली जाईल.

६) उमेदवारांना सध्या अस्तित्वात असलेले रजेचे नियम व इतर नियम शासकीय सेवेत प्रवेश करताना लागू असल्यास, तसेच नंतर वेळोवेळी होणाऱ्या संबंधीत नियमांमधील बदल त्यांच्यावर बंधनकारक असतील.

७) उमेदवारांना शासनाने या विभागात लागू केलेल्या विभागीय परीक्षा त्यांना विहित कालावधीत उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. जर ते परीक्षा उत्तीर्ण होऊ शकले नाही तर त्यांच्यावर नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल. त्यांना प्रशिक्षण किंवा पाठयक्रमास पाठविल्यास जावे लागेल व पुढे होणा-या विहित परीक्षा उत्तीर्ण व्हावे लागेल. अन्यथा वेतनवाढ रोखण्यात येईल अथवा सेवा समाप्त करण्यात येईल.

८) उमेदवारांना संगणक ज्ञानासंदर्भात शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.प्रशिक्षण-२०००/प्र.क्र.६१/२००१/३९, दि.१९/०३/२००३ व माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) शासन निर्णय क्र.मातंस/प्र.क्र.२७७/३९, दि.०४/०२/२०१३ मधील तरतुदीनुसार **संगणक हाताळणी वापराबाबतचे विहित प्रमाणपत्र** नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत प्राप्त करणे आवश्यक राहील, अन्यथा आपल्या सेवा समाप्त करण्यात येतील.

९) ज्या उमेदवारांची नियुक्ती सामाजिक आरक्षणांतर्गत आरक्षित पदावर झाली असल्यास जात वैधता प्रमाणपत्राच्या अधीन राहुन तात्पुरत्या स्वरुपात त्यांची नियुक्ती करण्यांत येत आहे. त्यांनी नियुक्तीच्या दिनांकापासुन सहा महिन्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्र कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.

१०) उमेदवारांस त्यांचे स्वग्राम सहा महिन्यांच्या आत घोषित करावे लागेल. त्यांनी तसे न केल्यास स्वग्राम घोषित करण्याची एक संधी त्यांनी गमावली असे समजण्यांत येईल व त्याबाबतचे अनुषंगिक लाभ त्यांना अनुज्ञेय राहणार नाहीत.

११) सदर उमेदवारांचे काम किंवा वर्तणूक अयोग्य, अपेक्षित दर्जाची नसल्यास अथवा असमाधानकारक आढळल्यास त्यांची सेवा कोणतेही पूर्वसूचना न देता समाप्त करण्यांत येईल. अथवा सेवेतुन कमी करण्यांस ते पात्र ठरतील.

१२) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांकः सेनिवे-२०२४/प्र.क्र.५४/सेवा-४, दि.२०/०९/२०२४ मधील तरतुदीनुसार दि.०१/०३/२०२४ पासून लागू करण्यांत आलेली राज्य शासनाची सुधारीत राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना किंवा केंद्र शासनाने दि.२४/०८/२०२४ पासून घोषित केलेली एकीकृत निवृत्ती वेतन योजना किंवा यामध्ये बदल झाल्यास शासन आदेशानुसार संबंधितांनी दिलेल्या विकल्पानूसार लागू राहील.

१३) सदर उमेदवारांना **हिंदी/मराठी भाषेच्या परीक्षा** त्याचप्रमाणे पुढे विहित होणा-या परीक्षा उत्तीर्ण व्हावे लागेल किंवा त्यापासून सूट मिळवावी लागेल, अन्यथा त्यांची वेतनवाढ रोखण्यात येईल अथवा सेवा समाप्त करण्यात येईल.

१४) प्रचलित शासन नियमानुसार सदर उमेदवारांचे सेवानिवृत्तीचे वय ५८ वर्षे राहील.

१५) सदर उमेदवारांस नोकरी सोडावयाची असल्यास नोकरी सोडण्यापूर्वी संस्थेस / विभागीय कार्यालयास एक महिन्याची पूर्वसूचना देणे, अथवा एक महिन्याचे मूळ वेतन शासनास जमा करणे आवश्यक आहे.

१६) उमेदवारांना मर्यादीत कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र रुजू होताना सादर करणे अनिवार्य असेल, सदर बाबतीत उमेदवारांना महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ मधील तरतुदी लागू राहतील.

१७) आजच्या स्थितीत उमेदवारांनी या कार्यालयाकडे सादर केलेल्या कागदपत्रांवरुन त्यांच्या जन्मतारखेची नोंद सेवापुस्तकात करण्यांत येईल. सदर नोंदीमध्ये बदल करावयाचा असल्यास विहित पुराव्यानिशी तसा अर्ज नियुक्तीच्या दिनांकापासून पुढील पाच वर्षाच्या आत सादर करावा. त्या कालवधीनंतर जन्मतारखेसंदर्भातील बदलाची विनंती विचारात घेतली जाणार नाही. याची त्यांनी नोंद घ्यावी.

१८) उमेदवारांना सेवेत रुजू होण्याकरीता प्रवासभत्ता किंवा इतर कुठलाही भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

१९) उमेदवारांनी सादर केलेले शैक्षणिक अर्हता, जातीचे प्रमाणपत्र व इतर प्रमाणपत्र त्यांच्या संपूर्ण सेवाकालावधीमध्ये बनावट असल्याचे कोणत्याही टप्प्यावर आढळून आल्यास ते शासन सेवेस अपात्र ठरतील व त्यांची सेवा तात्काळ समाप्त करण्यांत येईल व त्यांना शासकीय सेवेतील कोणताही हक्क राहणार नाही त्याचप्रमाणे ते फौजदारी कार्यवाहीस पात्र राहतील.

२०) शासन सेवेत रुजू झाल्यापासून शासनाच्या महाराष्ट्र नागरी सेवा नियमांतील विविध तरतुदींप्रमाणे कर्तव्य व जबाबदाऱ्या यांचे पालन करण्याची सर्वस्वी जबाबदारी त्यांची राहील.

२१) उमेदवारांची नियुक्ती ही विभागीय कार्यालय, मुंबई यांचे अधिनस्त असलेल्या ग्रामिण संवर्गाअंतर्गत झालेली असल्याने, सदर उमेदवार ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग व पालघर यां जिल्हयातील विभागीय कार्यालयांतर्गत असलेल्या कोणत्याही शासकीय संस्थेत बदलीस पात्र असेल.

२२) उमेदवाराने त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी आदेशाच्या **दिनांकापासून एक महिन्याच्या आत तात्काळ रुजू व्हावे.** सदर विहित मुदतीत जर त्यांनी नियुक्ती स्विकारली नाही तर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने घेतलेल्या परीक्षेत त्यांनी मिळवलेल्या गुणवत्ता क्रमानुसार त्यांना अनुज्ञेय असलेली जेष्ठता मिळणार नाही. शिवाय नियुक्तीच्या संदर्भात त्यांनी वरील मुदतीत काहीही कळविले नाही तर त्यांना नोकरीत स्वारस्य नाही असे समजून कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांच्या नियुक्तीचे आदेश रद्द करण्यांत येतील.

२३) वरील आदेशातील **अनुक्रमांक ५ श्री. सौरभ ज्ञानदेव भापकर** या दिव्यांग उमेदवाराने टंकलेखन अर्हतेचे प्रमाणपत्र धारण केलेले नसल्याने त्यांनी शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक अपंग-२०१६/प्र.क्र.११६/१६-अ, दिनांक १६ नोव्हेंबर २०१६ नुसार टंकलेखनाची परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी त्यांना त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाचा कालावधी व २ संधी अनुज्ञेय असल्यामुळे दिव्यांग आरक्षणाचा दावा करणाऱ्या पात्र उमेदवारांनी टंकलेखनाचे प्रमाणपत्र विहित मुदतीत सादर करणे बंधनकारक राहील.

२४) वरील आदेशातील **अनुक्रमांक ७ श्री. भगवंत काशिराम पारेकर** या माजी सैनिक उमेदवाराने टंकलेखन अर्हतेचे प्रमाणपत्र धारण केलेले नसल्याने त्यांनी शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक-संकीर्ण-२०२२/प्र.क्र.५७/का.२८, दिनांक ३० मे २०२३ नुसार टंकलेखनाची परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाचा कालावधी व २ संधी अनुज्ञेय असल्यामुळे सदर उमेदवारांनी विहित मुदतीत टंकलेखन प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

वर नमूद केलेल्या अटींच्या अधीन राहून सदर उमेदवारांची तात्पुरत्या स्वरुपात नेमणूक करण्यात येत आहे. वरील अटी मान्य असल्यास त्या मान्य असल्याचे रुपये १००/- च्या स्टॅम्प पेपरवर पंजीबध्द प्रतिज्ञापत्र संबंधीत कार्यालयप्रमुखाकडे सादर करुन अर्हतेसंबंधीच्या मूळ प्रमाणपत्रासह नमूद केलेल्या कार्यालयात रुजू व्हावे.

(प्रमोद अं. नाईक)
**सहसंचालक**
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई.

प्रति,

**उपरोक्त सर्व उमेदवारांना** कळविण्यांत येते की, त्यांनी नियुक्ती देण्यांत आलेल्या संस्थेत रुजू होताना, मूळ कागदपत्रे व साक्षांकित प्रती सादर करणे आवश्यक आहे.

**प्रत : माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीकरीता रवाना.**

१. मा. अप्पर सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई दालन क्रमांक ४३८, ४ था मजला यांना माहितीसाठी सविनय सादर.

२. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई. यांना माहिती करीता सादर.

३. कोषागार / उपकोषागार अधिकारी कार्यालय, पेण / मालवण / रत्नागिरी (संस्था प्रमुखांमार्फत)

४. प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, पेण /मालवण/ रत्नागिरी/ लोकनेते शामराव पेजे, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, रत्नागिरी

त्यांना कळविण्यात येते की, आपल्या संस्थेमध्ये नियुक्ती देण्यात आलेल्या उमेदवारास त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या पदावर अटी मान्य असल्याचे रुपये १००/- च्या स्टॅम्प पेपरवर पंजीबध्द प्रतिज्ञापत्र सादर केल्यावर व अर्हतेबाबतच्या मूळ प्रमाणपत्राची तपासणी करुन रुजू करुन घेण्यात यावे. तसेच त्यांचे चारित्र्य पडताळणी व आरोग्यविषयक तपासणी तात्काळ करुन घ्यावी व त्याबाबतचा अहवाल विहित मुदतीत या कार्यालयास पाठवावा.

५. निवड नस्ती.

(प्रमोद अं. नाईक)
**सहसंचालक**
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई.